





# दैनिक निडर निर्भिड जनसंचलन

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!








संपादक : जितेंद्र कायस्थ   Mob- 9822720784   Email- jansanchlan@gmail.com   RNI NO-MAHMAR/2022/90217

वर्ष ३ रे   अंक : ३७० वा   गुरूवार दि २१ मे २०२६   पृष्ठ ८   किमंत ३ रुपये


# ....दैनिक जनसंचलनचा इम्पॅक्ट!....

## बदली सेटिंगला बसला ब्रेक; आदेशांची धडाकेबाज सरबत्ती खुर्चीवरील जुनी मक्तेदारी संपुष्टात?

## अमरावतीतून धडक आदेश; कार्यालयात खळबळ, कर्मचाऱ्यांची धावपळ सुरू






**जनसंचलन/ बुलढाणा**

जिल्हाधिकारी कार्यालयातील बदली प्रक्रियेतील कथित गैरप्रकार उघड करताच दैनिक जनसंचलनच्या बातमीचा जोरदार परिणाम दिसू लागला आहे. वर्षानुवर्षे एकाच खुर्चीला चिकटून बसलेल्या कर्मचाऱ्यांच्या सेटिंगला अखेर धक्का बसला असून प्रशासन ॲक्शन मोडमध्ये आल्याचे चित्र समोर आले आहे. सामाजिक कार्यकर्ते इंगळे यांनी केलेल्या तक्रारीनंतर आणि दैनिक जनसंचलन ने मुद्दा लावून धरल्यानंतर महसूल विभागात खळबळ उडाली. त्याचा थेट परिणाम म्हणून विभागीय आयुक्त, अमरावती कार्यालयाकडून मोठा निर्णय घेत अनेक सहायक महसूल अधिकारी आणि महसूल सहाय्यक कर्मचाऱ्यांची प्रतिनियुक्ती आदेशाद्वारे करण्यात आली आहे. विशेष म्हणजे या कर्मचाऱ्यांना तात्काळ कार्यमुक्त करून अमरावती येथे रुजू होण्याचे आदेश देण्यात आले आहेत. यामध्ये अमरावती, अकोला, यवतमाळसह विविध जिल्ह्यांतील कर्मचाऱ्यांचा समावेश असून, वर्षानुवर्षे मुख्यालयात ठाण मांडून बसलेल्या यंत्रणेला आता हलवण्याची प्रक्रिया सुरू झाल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत. बदली नावाखाली चालणाऱ्या अंतर्गत फेरबदलांच्या खेळावर अखेर प्रशासनाने पाऊल उचलल्याचे दिसते. आधी उघडकीस आलेल्या प्रकरणांनुसार, काही कर्मचारी १० ते १५ वर्षे एकाच ठिकाणी कार्यरत होते. इतकेच नव्हे, तर कागदोपत्री बदली दाखवून प्रत्यक्षात त्याच कार्यालयात काम सुरू ठेवण्याचे प्रकारही समोर आले होते. यामुळे शासनाचा आर्थिक तोटा आणि प्रशासनातील पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते. दरम्यान, विभागीय आयुक्त कार्यालयाने काढलेल्या या आदेशामुळे इतर जिल्ह्यांमध्येही धाक निर्माण झाला असून, बुलढाण्यातील अनेक कर्मचाऱ्यांमध्ये धावपळ सुरू झाल्याची चर्चा रंगली आहे. आता खरेच बदली होणार का? असा सवाल अनेकजण करत आहेत. तज्ज्ञांच्या मते, ही कारवाई केवळ सुरुवात असून, २०२१ ते २०२५ दरम्यान झालेल्या सर्व बदल्यांची चौकशी झाल्यास आणखी मोठे धक्कादायक प्रकार समोर येण्याची शक्यता आहे. एकूणच दैनिक जनसंचलनच्या पाठपुराव्यामुळे प्रशासनाला हालचाल करावी लागली असून, सेटिंग संस्कृतीवर आघात झाल्याचे स्पष्ट दिसत आहे. आता पुढे शासन किती कठोर भूमिका घेते आणि ही मोहीम किती दूर जाते, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

## तत्कालीन जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाला केराची टोपली!

**बुलढाणा जिल्हाधिकारी कार्यालयातील तसेच तालुकास्तरीय कर्मचाऱ्यांच्या प्रतिनियुक्त्या रद्द करून त्यांना मूळ आस्थापनेवर पाठविण्याचे आदेश देऊनही त्याची अंमलबजावणी झालेली नसल्याचे समोर आले आहे. शासनाच्या ०१/१२/२०२३ च्या परिपत्रकानुसार वर्ग-३ कर्मचाऱ्यांच्या जिल्हाधिकारी कार्यालय, तहसील कार्यालय तसेच इतर शासकीय विभागांतील प्रतिनियुक्त्या रद्द करून सेवा मूळ ठिकाणी वर्ग करण्याचे निर्देश देण्यात आले होते. मात्र, या आदेशांना डावलून अनेक कर्मचारी अद्यापही प्रतिनियुक्तीच्या ठिकाणीच कार्यरत असल्याचे निदर्शनास आले आहे. यामुळे शासन निर्णय आणि शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन व शिस्तबद्ध प्रशासन अधिनियम २००५ च्या तरतुदींचा भंग होत असल्याचा आरोप होत आहे. दरम्यान, ०५/०६/२०२४ रोजी तत्कालीन जिल्हाधिकाऱ्यांनी पुन्हा आदेश निर्गमित करून सर्व प्रतिनियुक्त्या रद्द करण्याचे निर्देश दिले होते. तरीही अद्याप संबंधित कर्मचारी मूळ आस्थापनेवर परत न गेल्याचे स्पष्ट झाले असून प्रशासनातील शिस्तबद्धतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.**

# चला ! देशापुढे महाराष्ट्राच्या बचतीचा आदर्श ठेवूया !

ज्या ज्या वेळी देशावर संकट येते, त्या त्या वेळी महाराष्ट्र हा दिल्लीच्या मदतीला धावून जातो. हिमालयाच्या मदतीला सह्याद्री धावला ही महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाणांपासूनची आपली भूमिका आजही तितकीच जिवंत आहे. युद्ध असो, टंचाई असो, महापूर असो की महामारी- महाराष्ट्राने प्रत्येक संकटात देशाच्या पाठीशी उभे राहत मदतीचा नवा आदर्श निर्माण केला आहे. पश्चिम आशियातील वाढते तणाव आणि त्यातून निर्माण झालेल्या जागतिक आर्थिक अस्थिरतेच्या पार्श्वभूमीवर आज देश पुन्हा एका मोठ्या आव्हानासमोर उभा आहे. या संकटाचा कालावधी किती असेल हे आपल्या हातात नसले, तरी या अशा काळात संयम, शिस्त आणि बचत यामधून देशाच्या अर्थकारणाला बळ देण्याचे मोठे काम महाराष्ट्र करु शकतो. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या संदर्भात सर्वप्रथम आवाहन केले. त्यांनी देशवासियांना केलेले आवाहन हे केवळ खर्च कमी करण्याचे नाही, तर राष्ट्रहितासाठी जीवनशैली बदलण्याचे आहे. जितकी बचत, तितकी राष्ट्रसेवा हा संदेश त्यांनी अत्यंत स्पष्टपणे दिला आहे. अनावश्यक इंधन वापर टाळणे, सार्वजनिक वाहतुकीचा अधिक वापर करणे, ङ्गवर्क फ्रॉम होममला प्रोत्साहन देणे, स्वदेशी उत्पादनांचा स्वीकार वाढवणे, रासायनिक खतांवरील अवलंबित्व कमी करणे, ऊर्जा बचत करणे अशा अनेक बाबींवर त्यांनी भर दिला. या सूचनांचा विचार करता महाराष्ट्र शासनानेही तातडीने व्यापक उपाययोजनांची अंमलबजावणी सुरु केली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वतःच्या कृतीतून या संदेशाला विश्वासार्हता दिली आहे. विधान भवनात त्यांनी स्वतः दुचाकी चालवत केलेला प्रवेश हा केवळ प्रतिकात्मक नव्हता; तो प्रशासन आणि समाजाला दिलेला स्पष्ट संदेश होता. बचत ही फक्त भाषणातली गोष्ट नसून ती आचरणात उतरली पाहिजे. बंगळुरु येथील कार्यक्रमासाठी त्यांनी खासगी वा चार्टर्ड विमानाऐवजी प्रवासी विमानाने प्रवास केला, हीदेखील त्याच विचारसरणीची प्रचिती होती. नेतृत्व जेव्हा स्वतः उदाहरण घालून देते, तेव्हा समाज अधिक वेगाने बदल स्वीकारतो. त्यामुळे येत्या काळात नेतृत्वाचा संदेश तळागाळापर्यंत पोहचविण्याचे कसब प्रशासनाला दाखवायचे आहे. तर अगदी गाव पातळीवरुन शिस्तीत सूचनांची अंमलबाजवणी करायची आहे. राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी या पार्श्वभूमीवर संपूर्ण प्रशासकीय यंत्रणेला या परिस्थितीत काय करावे. या संदर्भातील सुस्पष्ट आदेश दिले आहेत. राज्य शासनाने जारी केलेल्या सूचनांमध्ये अनेक महत्त्वाच्या उपाययोजना समाविष्ट आहेत. शासकीय अधिकाऱ्यांचे अनावश्यक परदेश दौरे स्थगित करण्यात आले आहेत. कार्यालयीन कामासाठी वाहनांचा कमीत कमी वापर, शक्य असल्यास कारपूलिंग, सार्वजनिक वाहतुकीचा वापर आणि आठवड्यातून एक दिवस मेट्रो, लोकल किंवा बसने प्रवास करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या सूचनांमधून केवळ इंधन बचतच नव्हे, तर पर्यावरणपूरक जीवनशैलीचाही संदेश दिला जात आहे. आजच्या काळात ऊर्जा बचत हीच खरी राष्ट्रभक्ती ठरत आहे. शासनाने सरकारी कार्यालयांमध्ये नैसर्गिक प्रकाशाचा जास्तीत जास्त वापर करण्याचे निर्देश दिले आहेत. कार्यालयीन वेळ संपल्यानंतर दिवे, पंखे, वातानुकूलित यंत्रणा आणि संगणक बंद ठेवण्याबाबत काटेकोर अंमलबजावणी सुरू झाली आहे. वातानुकूलन यंत्रणांचे तापमान नियंत्रित ठेवण्याचा निर्णयही त्याचाच भाग आहे. प्रत्येक युनिट वीज वाचवणे म्हणजे देशाच्या अर्थव्यवस्थेवरील भार कमी करणे, ही भावना आता रुजवली जात आहे. ऊर्जेच्या पर्यायी साधनांवरही शासनाने विशेष भर दिला आहे. प्रधानमंत्री सूर्यघर योजनेअंतर्गत घराघरात सौरऊर्जा पोहोचवण्याचा प्रयत्न अधिक वेगाने सुरू आहे. इलेक्ट्रिक वाहनांच्या वापराला प्रोत्साहन देण्यासाठी चार्जिंग स्टेशन उभारणीस गती दिली जात आहे. पीएनजीच्या वापराला चालना देण्यासाठी मोठ्या शहरांतील हॉटेल्स आणि रेस्टॉरंट्सना प्रोत्साहन दिले जात आहे. ही केवळ बचतीची नव्हे, तर भविष्यातील शाश्वत विकासाची दिशा आहे. शासनाने डिजिटल आणि ऑनलाइन पद्धतींचा वापर वाढवण्यालाही प्राधान्य दिले आहे. मंत्रालयीन, विभागीय आणि जिल्हास्तरीय बैठका शक्य तितक्या व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. यामुळे वेळ, इंधन आणि आर्थिक संसाधनांची मोठ्या प्रमाणात बचत होणार आहे. आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात कार्यालयीन कार्यपद्धती अधिक स्मार्ट आणि मितव्ययी बनवण्याची ही योग्य वेळ आहे. बचतीचा हा विचार केवळ शासनापुरता मर्यादित राहता कामा नये. समाजातील प्रत्येक घटकाने त्यात सहभाग घेणे आवश्यक आहे. घरातील अनावश्यक वीज वापर कमी करणे, खासगी वाहनाऐवजी सार्वजनिक वाहतूक वापरणे, स्थानिक आणि स्वदेशी वस्तूंना प्राधान्य देणे, अन्नाची नासाडी टाळणे, पाण्याचा संयमाने वापर करणे, या छोट्या वाटणाऱ्या गोष्टींचा एकत्रित परिणाम मोठा असतो. राष्ट्रनिर्मिती ही फक्त सरकारची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे, ही जाणीव आता अधिक दृढ करण्याची वेळ आली आहे. कृषी क्षेत्रातही बचत आणि शाश्वततेचा विचार पुढे येत आहे. रासायनिक खतांचा अतिरेक कमी करून नैसर्गिक आणि सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन देण्यावर शासनाचा भर आहे. माती परीक्षण, पिकनिहाय खतांचा वापर आणि योग्य कृषी व्यवस्थापन याद्वारे खर्च कमी करताना उत्पादनक्षमता टिकवण्याचा प्रयत्न सुरू आहे. ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत राहिली तर देशाची आर्थिक घडीही अधिक सक्षम राहते, हे महाराष्ट्र जाणतो. त्यामुळे महाराष्ट्राने सुरुवात केली आहे. यातून एक घडी बसेल. यासाठी सर्वसामान्य नागरिकांचा प्रतिसाद महत्त्वाचा आहे. महाराष्ट्राची परंपरा ही फक्त संघर्षाची नाही, तर संकटावर मात करत देशाला दिशा देण्याची आहे. सहकार चळवळ असो, उद्योगधंद्यांची प्रगती असो किंवा सामाजिक बांधिलकी, महाराष्ट्राने नेहमीच देशाला आदर्श दिला आहे. आज पुन्हा एकदा तशीच वेळ आली आहे. बचत, संयम आणि जबाबदारी या तीन सूत्रांवर महाराष्ट्र चालला, तर देशासमोर एक नवा आदर्श उभा राहू शकतो. आज गरज आहे ती केवळ घोषणांची नाही, तर कृतीची. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्य शासनाने सुरू केलेली ही मोहीम प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचली पाहिजे. गावपातळीपासून शहरांपर्यंत, विद्यार्थ्यांपासून अधिकाऱ्यांपर्यंत आणि शेतकऱ्यांपासून उद्योगजगतापर्यंत सर्वांनी या बचतीच्या यज्ञात आपला सहभाग नोंदवला, तर महाराष्ट्र पुन्हा एकदा देशासाठी प्रेरणास्थान ठरेल. कारण संकटे येत राहतात पण संकटाच्या काळात देशासाठी उभा राहणारा महाराष्ट्र हा नेहमीच अधिक मोठा दिसतो. महाराष्ट्राचे दातृत्व जसे मोठे आहे. तसेच राज्याचे कर्तृत्व आणि जबाबदारीही महत्त्वाची आहे. अशा परिस्थितीत एक जबाबदार भारतीय म्हणून पुढे येऊ या ! प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आवाहनाला प्रतिसाद देवूया ! देशाला आत्मनिर्भर आणि आणखी मजबूत करुया !

**-प्रवीण टाके**
**उपसंचालक, (माहिती)**
**विभागीय माहिती कार्यालय, कोल्हापूर**
९७०२८५८७७७




*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# देशाला 'संपन्न ऊर्जा' राष्ट्र बनविण्यासाठी महाराष्ट्राचे बळ मिळणार : मुख्यमंत्री फडणवीस

## राज्य शासनाचा अणुऊर्जा निर्मितीसाठी कंपन्यांशी सामंजस्य करार

**पुणे/वृत्तसंस्था**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी भारताला संपन्न ऊर्जा राष्ट्र बनवून देशात शून्य कार्बन उत्सर्जन करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. या उद्दिष्ट पूर्तीसाठी महाराष्ट्र पुरेपूर प्रयत्न करीत आहे. स्वच्छ ऊर्जा निर्मिती क्षेत्रात राज्यात येणारी गुंतवणूक ही देशाला संपन्न ऊर्जा राष्ट्र बनवण्यासाठी निश्चितच बळ देणारी ठरणार आहे, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. राज्यात अणुऊर्जा निर्मिती क्षेत्रामध्ये गुंतवणूक करण्यास इच्छुक असलेल्या कंपन्यांना शासनाच्यावतीने संपूर्ण सहकार्य करण्यात येईल, अशी ग्वाहीही यावेळी मुख्यमंत्र्यांनी दिली.

मंत्रालयात आयोजित बैठकीत अणुऊर्जा निर्मिती क्षेत्रामध्ये राज्य शासनासोबत चार कंपन्यांचे सामंजस्य करार करण्यात आले. यामध्ये एनटीपीसीएल (नॅशनल थर्मल पॉवर कॉर्पोरेशन लिमिटेड), अदानी पॉवर कंपनी, रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड, ललितपुर पावर जनरेशन कंपनी लिमिटेड (बजाज उद्योग समूह) यांचा समावेश आहे. बैठकीला पारंपारिक ऊर्जा मंत्री अतुल सावे, ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला, एनटीपीसी लिमिटेडचे मुख्य महाव्यवस्थापक ए. पी. सामल, अदानी पॉवर कंपनीचे बिझनेस हेड विवेक शर्मा, रिलायन्स इंडस्ट्रीजच्या न्यूक्लिअर एनर्जी बिजनेसचे अध्यक्ष रंजय शरण आदी उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, राज्यामध्ये स्वच्छ ऊर्जा निर्मिती क्षेत्रात मोठ्या संधी आहेत. स्वच्छ ऊर्जा निर्मितीमध्ये अणुऊर्जा ही अत्यंत महत्त्वाची आहे. या क्षेत्रात होत असलेल्या गुंतवणुकीतून राज्य ऊर्जा निर्मितीमध्ये अधिक वेगाने प्रगती करणार आहे. ही गुंतवणूक केवळ ऊर्जा निर्मितीसाठीच लाभाची नसून त्यामुळे रोजगाराच्या संधीही उपलब्ध होणार आहेत. स्वच्छ ऊर्जा निर्मितीमध्ये महाराष्ट्र नेहमी देशात अग्रेसर असणार आहे.



### करारामुळे होणारी अणुऊर्जा व रोजगार निर्मिती

- अदानी पॉवर लिमिटेड कंपनी राज्यात १ लाख ५० हजार कोटींची गुंतवणूक करणार असून त्यातून ६ हजार मेगावॅट ऊर्जा निर्मिती होईल. प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरीत्या १२ हजार रोजगार निर्मिती अपेक्षित आहे. रिलायन्स इंडस्ट्रीज २ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक करणार आहे. यामधून ७२०० मेगावॅट ऊर्जा निर्मिती व एक लाखाच्यावर रोजगार उपलब्ध होणार आहे. एनटीपीसी लिमिटेड १ लाख कोटींची गुंतवणूक करणार असून ७२०० मेगावॅट ऊर्जा निर्मिती अपेक्षित आहे. यामध्ये ५ हजार रोजगार निर्मिती होईल. ललितपुर पॉवर जनरेशन कंपनी लिमिटेड (बजाज उद्योग समूह) राज्यात २ लाख कोटींची गुंतवणूक करणार आहे. यामधून पाच हजार मेगावॅट ऊर्जा निर्मिती आणि ३ हजार रोजगार निर्मिती होणार आहे. अशाप्रकारे राज्यात एकूण ६ लाख ५० हजार कोटींची गुंतवणूक होणार असून २५ हजार ४०० मेगावॅट इतकी ऊर्जा निर्मिती आणि १ लाख २३ हजार ५०० रोजगार निर्मिती अपेक्षित आहे.

---

## देशाची आर्थिक घडी विस्कटली : राहुल गांधी

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था**

राहुल गांधींचा नवी दिल्ली: देशातील इंधन दरवाढीच्या मुद्द्यावरून लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी मंगळवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर जोरदार निशाणा साधला. देशावर लवकरच मोठे आर्थिक संकट ओढवणार असून आगामी काळ अत्यंत कठीण असेल, असा इशारा राहुल गांधी यांनी दिला आहे. तेल कंपन्यांनी सलग दुसऱ्यांदा केलेल्या दरवाढीनंतर त्यांनी सरकारला धारेवर धरले.



रायबरेली दौऱ्यादरम्यान माध्यमांशी बोलताना काँग्रेस नेते राहुल गांधी म्हणाले की, देशाच्या अर्थव्यवस्थेसाठी कठीण काळ येत आहे. कोणतीही ठोस कृती करण्याऐवजी पंतप्रधान मोदी लोकांना परदेश दौरे न करण्याचा सल्ला देत आहेत. मोदींनी देशाची आर्थिक घडी विस्कटून टाकली आहे. मी गेल्या काही दिवसांपासून सातत्याने सांगतोय की देशावर आर्थिक संकट घोंघावते. त्यांची 'अदानी-अंबानी' केंद्रित रचना फार काळ टिकणार नाही; ती कोसळेल. दुर्दैवाची गोष्ट म्हणजे, याचा फटका मात्र सामान्य माणसाला बसेल, असे राहुल गांधी म्हणाले.

राहुल गांधी यांनी पंतप्रधानांच्या परदेश दौऱ्यांवरूनही टीका केली. ते म्हणाले की, या आर्थिक धक्क्याचा परिणाम अदानी, अंबानी किंवा मोदींवर होणार नाही, तर तो सामान्य माणसावर खोलवर परिणाम करेल. हा परिणाम अभूतपूर्व असेल. परिस्थिती गंभीर होत असताना उपाययोजना करण्याऐवजी मोदी लोकांना परदेश दौरे टाळण्याचा सल्ला देत आहेत, तर दुसरीकडे ते स्वतः मात्र परदेश दौऱ्यावर आहेत, असा टोला त्यांनी लगावला.

## नीट सारखाच घोटाळा एमएच-सीईटी परीक्षेतही : सावंत

### बारावीला 35-40 टक्के असणाऱ्यांना सीईटी मध्ये १०० पर्सेंटाईल कसे?

**मुंबई/वृत्तसंस्था**

नीट सारखाच गडबड घोटाळा एमएच–सीईटी परिक्षेतही झाल्याचा आरोप काँग्रेसचे नेते सचिन सावंत यांनी केला आहे. नीट परीक्षेच्या पेपर लिक प्रकरणात महाराष्ट्रासह देशभरात सीबीआयकडून कारवाई केली जात आहे. या पार्श्वभूमीवर सचिन सावंत यांनी पत्रकार परिषद घेत आणखी एक गंभीर गौप्यस्फोट केला आहे.



सचिन सावंत म्हणाले, देशभरात नीट पेपरफुटीने विद्यार्थी आणि पालकांची चिंता वाढली आहे. आयुष्याचा महत्त्वाच्या टप्प्यावर जर तरुण पिढीला फसवले जात असेल तर ही देशाची सुद्धा फसवणूक आहे. नीट पेपरफुटीची चौकशी सुरू असली तरी अशा प्रकारच्या चौकशीतून पुढे काहीही निष्पन्न होत नाही, हा आजवरचा अनुभव आहे. तसेच नीट सारखाच गडबड घोटाळा एमएच-सीईटी परीक्षेतही झाला आहे. दहावी बारावीला जेमतेम 35-40 टक्के पडलेल्या विद्यार्थ्यांना एमएच-सीईटी परीक्षेत 100 पर्सेंटाईल पडलेले आहेत, हा घोटाळा असून त्याची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींना कठोर शिक्षा करा, अशी मागणी सावंत यांनी केली आहे. पुढे बोलताना सचिन सावंत म्हणाले, एमएच-सीईटी परीक्षेचा अभ्यासक्रम हा 11-12 वीचा असतो, 10 वी 12 परीक्षेत जेमतेम मार्क्स मिळवलेल्या 22 विद्यार्थ्यांना एमएच-सीईटी परीक्षेत मात्र 100 पर्सेंटाईल मिळालेले आहेत.

ज्या विद्यार्थ्याला 10 वीच्या परीक्षेत 37 टक्के मार्क्स मिळाले त्याला एमएच-सीईटी मध्ये 99.971 टक्के पर्सेंटाईल मिळाले आहेत. बारावीत ज्यांना 51 टक्के मार्क्स मिळाले अशा दोन विद्यार्थ्यांना एमएच-सीईटी मध्ये 100 पर्सेंटाईल, 45 टक्के मार्क्स पडलेल्याला 100 पर्सेंटाईल आणि 39 टक्के मार्क्स पडलेल्या विद्यार्थ्याला 100 पर्सेंटाईल पडलेले आहेत. बारावीला ज्या विद्यार्थ्याला 35 मार्क्स पडले त्यालाही 100 पर्सेंटाईल पडले आहेत.

---

## पेट्रोल-डिझेलमध्ये प्रतिलिटर 90 पैशांची दरवाढ : चार दिवसात दुसऱ्यांदा वाढल्या किमती



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था**

देशात पुन्हा एकदा पेट्रोल आणि डिझेलच्या दरांमध्ये मोठी वाढ करण्यात आली आहे. तेल कंपन्यांनी मंगळवारी पेट्रोल आणि डिझेलच्या किमतीत प्रतिलिटर सुमारे 90 पैशांची वाढ केली आहे. विशेष म्हणजे, अवघ्या एका आठवड्यात इंधन दरवाढीची ही दुसरी वेळ असल्याने सर्वसामान्य नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. या नव्या दरवाढीच्या अवघ्या तीन दिवस आधी, शुक्रवारीच केंद्र सरकारने देशभरात पेट्रोल आणि डिझेलच्या दरात प्रतिलिटर तीन रुपयांची मोठी वाढ केली होती. त्या वाढीनंतर दिल्लीमध्ये पेट्रोलचा दर 94.77 रुपयांवरून 97.77 रुपये प्रतिलिटर झाला होता, तर डिझेलचा दर 87.67 रुपयांवरून 90.67 रुपये प्रतिलिटर पर्यंत पोहोचला होता. आता मंगळवारी पुन्हा दरवाढ झाल्यानंतर राजधानी दिल्लीमध्ये पेट्रोलच्या दरात आणखी 87 पैशांची वाढ होऊन ते 98.64 रुपये प्रतिलिटर दराने विकले जात आहे. तर डिझेलच्या किमतीत 91 पैशांची वाढ होऊन त्याचा दर 91.58 रुपये प्रतिलिटरपर्यंत पोहोचला आहे.

सरकारी तेल कंपन्यांना दरमहा सुमारे २५,००० कोटी रुपयांचा प्रचंड तोटा सहन करावा लागत आहे. पेट्रोलियम मंत्रालयाच्या माहितीनुसार, या कंपन्यांना रोज ७५० कोटी रुपयांचे नुकसान होत होते, जे १५ मे रोजी झालेल्या दरवाढीमुळे थोडे कमी झाले आहे.

### प्रमुख महानगरांमधील दर...

- दिल्लीप्रमाणेच देशातील इतर महानगरांमध्येही पेट्रोल आणि डिझेलच्या दरात मोठी वाढ झाली आहे. आर्थिक राजधानी मुंबईमध्ये पेट्रोलच्या किमतीत 91 पैशांची वाढ झाल्याने ते 107.59 रुपये प्रतिलिटरवर पोहोचले आहे, तर डिझेल 94 पैशांनी महाग होऊन 94.08 रुपये प्रतिलिटर दराने विकले जात आहे.
- कोलकातामध्ये पेट्रोलच्या दरात 96 पैशांची वाढ झाली असून पेट्रोलचा दर 109.70 रुपये प्रतिलिटर झाला आहे. डिझेलच्या किमतीत 94 पैशांची वाढ होऊन ते 96.07 रुपये प्रतिलिटरवर पोहोचले आहे.
- चेन्नईमध्येही इंधन दरवाढीचा परिणाम दिसून आला आहे. पेट्रोल 82 पैशांनी महाग होऊन 104.49 रुपये प्रतिलिटर झाले आहे, डिझेलच्या दरात 86 पैशांची वाढ होऊन ते 96.11 रुपये प्रतिलिटरवर पोहोचले आहे.

### पेट्रोल-डिझेल आणखी १७ रुपयांपर्यंत महागणार?

- सर्वसामान्यांच्या खिशाला पुन्हा एकदा मोठी कात्री लागण्याची शक्यता आहे. नुकतीच झालेली ३ ते ४ रुपयांची इंधन दरवाढ पुरेशी नसून, ऑइल कंपन्यांचा तोटा भरून काढण्यासाठी पेट्रोल आणि डिझेलच्या किमतीत आणखी १३ ते १७ रुपयांची वाढ करावी लागेल, असा अंदाज 'कोटक इन्स्टिट्यूशनल इक्विटीज' या आघाडीच्या ब्रोकरेज संस्थेने व्यक्त केला आहे. पश्चिम आशियातील वाढता संघर्ष आणि आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या वाढत्या किमतींमुळे भारतासमोरील आर्थिक आव्हाने कमालीची वाढली आहेत.

# “त्विशा शर्माची आत्महत्याच, तिची हत्या झालेली नाही”; वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याने काय सांगितलं?

**मुंबई/वृत्तसंस्था**

त्विशा शर्माने आत्महत्या केली, तिची हत्या झालेली नाही अशी माहिती भोपाळचे पोलीस आयुक्त संजय कुमार यांनी दिली आहे. त्विशाचा विवाह सहा महिन्यांपूर्वी झाला होता. तिचा मृतदेह १२ मे रोजी तिच्या नवऱ्याच्या घरी गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. यानंतर त्विशाची हुंड्यासाठी हत्या करण्यात आल्याचा आरोप तिच्या आई वडिलांनी केला होता. दरम्यान पोलीस आयुक्त संजय कुमार यांनी त्विशाने आत्महत्याच केली आहे तिची हत्या झालेली नाही अशी माहिती आता दिली आहे. त्विशाची सासू गिरीबाला सिंग या माजी न्यायाधीश आहेत. त्यामुळे या प्रकरणात दबाव टाकला जातो आहे असाही आरोप त्विशाच्या घरातल्यांनी केला आहे. मात्र आता पोलीस आयुक्तांनीच ही आत्महत्या आहे असं म्हटलं आहे.

भोपाळ येथील एम्स रुग्णालयाने दिलेल्या अहवालानुसार त्विशाच्या मानेवर समांतर अंतरावर दोन खुणा आहेत. नायलॉनच्या बेल्टने तिचा गळा आवळला गेल्याचं दिसतं आहे. मात्र हा बेल्ट ऑटोप्सी दरम्यान AIIMS च्या वैदकीय मंडळाला दिलेला नाही. १२ मे रोजी त्विशाचा मृतदेह गळफास घेतलेल्या अवस्थेत तिच्या नवऱ्याच्या घरी आढळला होता. त्यानंतर आता हा शवविच्छेदन अहवाल समोर आला आहे. त्याचप्रमाणे त्विशाच्या शरीरावर बऱ्याच जखमा दिसून येत आहेत असेही शवविच्छेदन अहवालात स्पष्ट करण्यात आलं आहे. दरम्यान पोलिसांनी हा बेल्ट आम्ही नंतर जप्त केला कारण त्विशाचा मृतदेह आम्ही तिच्या घरुन ताब्यात घेतला नाही तर रुग्णालयातून ताब्यात घेतला आणि शवविच्छेदनासाठी पाठवला असं स्पष्टीकरणही दिलं आहे. पोलीस आयुक्त संजय कुमार यांनी एनडीटीव्हीला दिलेल्या मुलाखतीत ही आत्महत्या आहे असं म्हटलं आहे.

त्विशाचा मृतदेह १२ मे रोजी तिच्या घरी होता, ज्यानंतर आम्ही या प्रकरणाचा सगळा तपास केला. आम्ही त्विशाच्या मृतदेहाचं शवविच्छेदनही केलं. मात्र यात कुठेही आढळून आलं नाही की त्विशाची हत्या झाली आहे. तसंच आम्हाला जे पुरावे सापडले आहेत त्यावरुनही हे स्पष्ट होतं आहे की ही आत्महत्या आहे. त्विशाची हत्या झालेली नाही. तिने आत्महत्या केली आहे असं पोलीस आयुक्तांनी म्हटलं आहे.



त्विशा शर्माच्या मृत्यू प्रकरणात तपास करत असलेल्या विशेष तपास पथकाने म्हणजेच एसआयटीने हे स्पष्ट केलं आहे की त्विशाच्या नवऱ्याच्या घरातून नायलॉनचा एक पट्टा आम्ही जप्त केला आहे. मात्र शवविच्छेदन अहवालाच्या दरम्यान आम्ही तो डॉक्टरांना दिला नाही. एसीपी रजनीश कश्यप यांनी ही माहिती दिली. कश्यप पुढे म्हणाले की या प्रकरणाचा तपास अद्यापही सुरु आहे. आम्ही तिला जखमा कशा झाल्या होत्या याचाही शोध घेत आहोत. दरम्यान एसआयटीमध्ये असलेले पोलीस अधिकारी सुनील दुबे यांनी इंडियन एक्स्प्रेसला हे सांगितलं की त्विशाचा मृतदेह आम्ही पोलिसांनी तिच्या घरुन ताब्यात घेतला नाही.आम्ही भोपाळ एम्स रुग्णालयात आलो तेव्हा आम्हाला समजलं की तिचा मृत्यू झाला आहे. आम्ही रुग्णालयात पोहचेपर्यंत आम्हाला ही माहिती देण्यात आली की त्विशाने आत्महत्या केली आहे. त्यानंतर आमचं एक पथक हे तिच्या नवऱ्याच्या घरी गेलं. त्या ठिकाणी आम्हाला नायलॉनचा एक पट्टा सापडला आहे. व्यायाम करण्यासाठी हा पट्टा वापरला जातो. हा पट्टा आम्ही जप्त केला. पण त्यापूर्वी या ठिकाणी शवविच्छेदन प्रक्रिया पूर्ण झाली होती.

त्विशा शर्माचा मृत्यू झाल्यापासून तिचा नवरा समर्थ सिंग बेपत्ता आहे. तो कुठे आहे याबाबत कुणालाही अद्याप माहिती नाही.समर्थ सिंग हा पेशाने वकील आहे तर त्याची आई गिरीबाला सिंग या निवृत्त न्यायाधीश आहेत. दुसरीकडे त्विशाच्या सासूने म्हणजेच गिरीबाला सिंग यांनीही त्विशावर बरेच आरोप केले आहेत.

त्विशाची सासू (सेवानिवृत्त न्यायाधीश) गिरीबाला सिंग यांनी असा दावा केला आहे की, त्विशा अंमली पदार्थांच्या आहारी गेली होती आणि भोपाळमध्ये तिच्यावर मानसोपचार सुरू होते. जामीन अर्जात असा दावा करण्यात आला आहे की, ड्रग्स न मिळाल्यास त्विशाला शारीरिक अस्वस्थता आणि थरथराट जाणवायचा आणि नोएडा येथे तिला अंमली

## बंधाऱ्यात बुडून महिलेसह तीन चिमुकल्यांचा मृत्यू; नांदूरशिंगोटेत मजूर कुटुंबावर शोककळा

**सिन्नर/वृत्तसंस्था**

सिन्नर तालुक्यातील नांदूरशिंगोटे येथील नागरे वस्ती परिसरातील बंधाऱ्यात बुडून महिला आणि तीन चिमुकल्यांचा करुण मृत्यू झाल्याची घटना शनिवारी दुपारी चारच्या सुमारास घडली. यवतमाळ जिल्ह्यातून पुण्याकडे कामासाठी निघालेल्या मजूर कुटुंबावर या दुर्घटनेमुळे शोककळा पसरली आहे.मृतांमध्ये मनीषा विजय रामजोशी (वय २८), तिचा मुलगा कार्तिक विजय राम जोशी (११), तसेच भाचे आदित्य राहुल शिंदे (७) आणि अविनाश राहुल शिंदे (८, सर्व रा. वडारपुरा, डिग्रस, जि. यवतमाळ) यांचा समावेश आहे.डिग्रस येथील हे कुटुंब पुणे येथे नाली खोदकामाच्या कामासाठी निघाले होते. इतर नातेवाइकांची वाट पाहण्यासाठी त्यांनी दोन दिवसांपूर्वी नांदूरशिंगोटे परिसरात तात्पुरता मुक्काम केला होता. मुक्कामाच्या ठिकाणाजवळील नागरे बंधाऱ्यावर शनिवारी मनीषा रामजोशी कपडे धुण्यासाठी बंधाऱ्यावर गेल्या. सोबत कार्तिक, आदित्य आणि अविनाश हेही गेले होते.बराच वेळ उलटूनही चौघे परत न आल्याने विजय रामजोशी आणि राहुल शिंदे यांनी बंधाऱ्याकडे धाव घेतली. तेथे कपडे आणि चपला आढळल्याने संशय बळावला. यानंतर दोघांनीही बंधाऱ्यात उतरून शोध सुरू केला. काही वेळातच चारही जणांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले.तर दुसऱ्या एका घटनेत, बीड जिल्ह्यातील धारूर तालुक्यातील हिंगणी येथील सरस्वती तलावात मासेमारी व्यवसाय करणाऱ्या एकाच कुटुंबातील दोन मुलींचा पाण्यात बुडून मृत्यू झाल्याची दुर्घटना शनिवारी दुपारी घडली. हिंगणी (ता. धारूर) येथील मासेमारी व्यवसाय करणाऱ्या कुटुंबातील एका महिलेसह सहा मुली शनिवारी १२ वाजण्याच्या दरम्यान हिंगणी येथील सरस्वती तलावावर गेल्या होत्या. यातील तीन मुली थर्माकॉलच्या तराफ्यावरून तलावात उतरल्या. अचानक तराफा पलटी होऊन पलक पारवे, दिव्या कांबळे आणि मोहिनी पारवे पाण्यात पडल्या. यातील पलक श्याम पारवे आणि दिव्या विकास कांबळे व यांचा बुडून मृत्यू झाला.

## पुण्यात बनावट सोन्याचा मोठा घोटाळा! तारण ठेवून राष्ट्रीयीकृत बँकेची ४ कोटींची फसवणूक

**पुणे/वृत्तसंस्था**

बनावट सोने तारण ठेवून राष्ट्रीयीकृत बँकेची चार कोटी २३ लाख रुपयांची फसवणूक करण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी सिंहगड रस्ता पोलीस ठाण्यात दोन सराफ व्यावसायिकांसह १३ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत राष्ट्रीयीकृत बँकेच्या व्यवस्थापकाने सिंहगड रस्ता पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, सराफ व्यावसायिकांसह १३ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी हे सिंहगड रस्त्यावरील हिंगणे खुर्द येथील एका राष्ट्रीयीकृत बँकेत शाखा व्यवस्थापक आहेत. आरोपी सराफ व्यावसायिकांची बँकेकडून मूल्यांकनकार (व्हॅल्यूअर) म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. आरोपींनी बँकेत कमी शुद्धतेचे सोने तारण ठेवून कर्ज मिळवले. आरोपी मूल्यांकनकार यांनी बनावट सोने हे शुद्ध असल्याचे प्रमाणपत्र बँकेला दिले होते.

बनावट प्रमाणपत्राच्या आधारे आरोपींनी २६ कर्जप्रकरणांद्वारे बँकेकडून चार कोटी ४४ लाख रुपयांचे कर्ज मंजूर करवून घेतले. आरोपी मूल्यांकनकारांनी दिलेल्या प्रमाणपत्राबाबत बँकेला संशय आला. त्यामुळे बँकेत तारण ठेवलेल्या या सोन्याचे परीक्षण पुन्हा करण्यात आले. तेव्हा फसवणुकीचा प्रकार उघडकीस आला. आर्थिक




गुन्हे शाखेच्या पोलीस निरीक्षक दीपाली भुजबळ तपास करत आहेत.

शेअर बाजारात गुंतवणुकीच्या आमिषाने दोघांची एक कोटी ६८ लाखांची फसवणूक करण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.याबाबत एकाने नांदेड सिटी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. या प्रकरणात गुन्हा दाखल करण्यात आलेला एक आरोपी सोलापूर जिल्ह्यातील आहे.

तक्रारदार हे सिंहगड रस्ता परिसरातील धायरी भागात राहायला आहेत. आरोपींनी तक्रारदाराला शेअर बाजारात गुंतवणुकीचे आमिष दाखविले होते. शेअर बाजारात गुंतवणूक केल्यास १५ टक्के परतावा मिळेल, असे आमिष दाखवून आरोपींनी त्यांना तक्रारदारासह त्यांच्या मित्राला जाळ्यात ओढले. त्यानंतर त्यांच्याकडून वेळोवेळी पैसे घेतले. तक्रारदारसह मित्राला परतावा दिला नाही. फसवणूक झाल्याचे उघडकीस आल्यानंतर त्यांनी पोलिसांकडे तक्रार दिली.

# नीट पेपर फुटीचे जाळे नागपूरपर्यंत; नांदेड कनेक्शनमध्ये असलेला ‘आलोक’ सीबीआयच्या रडारवर, हजारो विद्यार्थ्यांना पेपर विक्रीचा संशय

**मुंबई/वृत्तसंस्था**

देशभरात खळबळ उडवून देणाऱ्या ‘नीट-यूजी २०२६’ पेपरफुटी घोटाळ्यात आता नागपूर कनेक्शन समोर आहे. या रॅकेटचा नांदेड पॅटर्न तपासताना सीबीआयच्या रडारवर आता नागपूर येथील ‘आलोक’ नावाचा संशयित मास्टरमाइंड आला आहे. या आलोकनेच किमान एक हजार विद्यार्थ्यांना नीटचा पेपर विकल्याचा दाट संशय केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाला आहे.

लातूरच्या नामांकित ‘आरसीसी क्लासेस’चे (RCC) संचालक प्रा. शिवराज मोटेगावकर याला सीबीआयने पुण्यातून अटक केली असून, विशेष न्यायालयाने त्याला ९ दिवसांची सीबीआय कोठडी सुनावली आहे. तर मोटेगावरच्या मुलालाही चौकशीसाठी सीबीआयने ताब्यात घेतल्याची माहिती मिळत आहे. नीट घोटाळ्याच्या तपासात नागपूरच्या 'आलोक' या गूढ नावाभोवती आता सीबीआयचा फास आवळला जात आहे. सीबीआयच्या प्राथमिक चौकशीत समोर आलेले त्याचे कारनामे थक्क करणारे आहेत. आलोकने देशभरातील आणि विशेषतः महाराष्ट्रातील जवळपास १ हजार विद्यार्थ्यांपर्यंत थेट किंवा दलालांमार्फत पेपर पोहोचवल्याचा संशय आहे. परीक्षा सुरू होण्यापूर्वी आलोकने अनेक विद्यार्थ्यांना आणि पालकांना पुण्यात बोलावून घेतले होते. तेथेच गोपनीय ठिकाणी ठेवून त्यांना पेपर रटवून घेण्यात आल्याची




धक्कादायक माहिती समोर येत आहे. आलोक हा नागपुरातील कोणत्या मोठ्या रॅकेटचा हिस्सा आहे की तो स्वतःच मुख्य सूत्रधार आहे, याबाबत सीबीआयने गोपनीयता पाळली असून त्याचा कसून शोध सुरू आहे. नीट पेपरफुटी प्रकरणी मुख्य संशयित शिवराज मोटेगावकरला अटक केल्यानंतर, आता सीबीआयने त्याच्या मुलालाही चौकशीसाठी ताब्यात घेतले आहे. मोटेगावकरच्या मुलाने यावर्षी बारावीची परीक्षा दिली असून, त्याला फुटलेल्या प्रश्नपत्रिकेचा थेट फायदा झाल्याचा संशय तपास यंत्रणांनी व्यक्त केला आहे. या पार्श्वभूमीवर, विविध आर्थिक व्यवहार आणि तांत्रिक दुव्यांची कसून पडताळणी केली जात आहे. सध्या शिवराज मोटेगावकरच्या मुलाची पुण्यातील सीबीआय कार्यालयात चौकशी सुरू असल्याची माहिती मिळत आहे. मात्र, अधिकृत पातळीवर सीबीआयकडून याबाबत कोणतेही निवेदन जारी करण्यात आलेले नाही.

# राजस्थानने प्लेऑफच्या आशा ठेवल्या जिवंत, सूर्यवंशी-जुरेलची वादळी फटकेबाजी





**मुंबई, वृत्तसंस्था :**

राजस्थान रॉयल्सने लखनौ सुपर जायंट्सचा ७ विकेट्सने पराभव केला आहे. राजस्थानचा संघ या विजयासह प्लेऑफमधील शर्यतीत कायम आहे. राजस्थानच्या या विजयाचा हिरो वैभव सूर्यवंशी ठरला. सूर्यवंशीचं शतक हुकलं असलं तरी त्याने वादळी खेळी साकारत संघाच्या विजयात ध्रुव जुरेलसह मोठं योगदान दिलं.

राजस्थान रॉयल्सचा संघ १४ गुणांसह या विजयानंतर चौथ्या स्थानी पोहोचला आहे. यासह राजस्थान रॉयल्सकडे प्लेऑफ गाठण्याची मोठी संधी असून त्यांना मुंबई इंडियन्सविरूद्धचा अखेरचा सामना जिंकावा लागणार आहे.

लखनौने दिलेल्या २२१ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना यशस्वी जैस्वालने संघाला वादळी सुरूवात करून दिली. यशस्वी २३ चेंडूत ८ चौकार व एका षटकारासह ४३ धावा करत बाद झाला. तर वैभव सूर्यवंशीने ध्रुव जुरेलसह संघाच्या विजयाचा पाया रचला. या दोघांनी ४५ चेंडूत १०५ धावा केल्या. सूर्यवंशीचं शतक हुकलं असलं तरी त्याने ३८ चेंडूत ७ चौकार व १० षटकारांसह ९३ धावांची उत्कृष्ट खेळी केली. तर ध्रुव जुरेलने अर्धशतक करत ३८ चेंडूत ३ चौकार व ३ षटकारांसह नाबाद ५३ धावांची खेळी केली. तर फरेराने १६ धावांचं योगदान दिलं. अखेरच्या षटकात २ धावांची गरज असताना फरेराने षटकार लगावत सामना जिंकून दिला आहे.

राजस्थानने सामन्याची नाणेफेक जिंकत लखनौला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केलं होतं. जोश इंग्लिस व मिचेल मार्शच्या जोडीने संघाला वादळी सुरूवात करून दिली. पहिल्या विकेटसाठी दोघांनी ५० चेंडूत १०९ धावांची भागीदारी साकारली. जोश इंग्लिसने २९ चेंडूत ७ चौकार व ३ षटकारांसह ६० धावांची खेळी केली. तर मिचेल मार्श पुन्हा एकदा शतकाच्या उंबरठ्यावर येत बाद झाला. मार्शने या सामन्यात ५७ चेंडूत ११ चौकार व ५ षटकारांसह ९६ धावांची खेळी केली. निकोलस पुरनने १६ धावांचं योगदान दिलं. तर पंतने ३५ धावांची महत्त्वपूर्ण खेळी करत संघाला २२० धावांपर्यंत नेलं.

## गॉर्डिओला यांचा मँचेस्टर सिटी सोडण्याचा निर्णय

**चेपॉक/वृत्तसंस्था**

पेप गॉर्डिओला यांनी इंग्लिश क्लब मँचेस्टर सिटीचे प्रशिक्षकपद सोडण्याचा निर्णय घेतला आहे. याबाबत अधिकृत घोषणा करण्यात आली नसली, तरी ब्रिटीश प्रसारमाध्यमांनी दिलेल्या माहितीनुसार, रविवारी अॅश्टन व्हिलाविरुद्ध होणार्या हंगामातील अखेरच्या सामन्यानंतर गॉर्डिओला मँचेस्टर सिटीला निरोप देणार आहेत.



गॉर्डिओला यांच्या दहा वर्षांच्या कार्यकाळात मँचेस्टर सिटीने तब्बल २० जेतेपदे मिळवली. यात एकूण सहा इंग्लिश प्रीमियर लीग जेतेपदांचाही समावेश आहे. गॉर्डिओला यांच्या मार्गदर्शनाखालीच मँचेस्टर सिटीने २०२१ ते २०२४ अशा सलग चार हंगामांत प्रीमियर लीग जिंकत इतिहास घडवला. २०२२-२३च्या हंगामात सिटीने प्रीमियर लीग, चॅम्पियन्स लीग आणि 'एफए चषक' अशा तीन मोठ्या स्पर्धा जिंकण्याची किमया साधली होती. यंदाच्या हंगामात सिटीने लीग चषक आणि 'एफए चषक' या स्पर्धांचे जेतेपद मिळवले आहे. मँचेस्टर सिटीशी जोडले जाण्यापूर्वी गॉर्डिओला यांनी बार्सिलोना (२००८-१२) आणि बायर्न म्युनिक (२०१३-१६) या बलाढ्य क्लबचेही प्रशिक्षकपद यशस्वीरीत्या भूषवले होते. त्यामुळे त्यांची फुटबॉल इतिहासातील सर्वकालीन सर्वोत्कृष्ट प्रशिक्षकांमध्ये गणना केली जाते. आता मँचेस्टर सिटीच्या प्रशिक्षकपदी एन्झो मारेस्का यांची निवड केली जाणार असल्याचे वृत्त आहे. मारेस्का यांनी गॉर्डिओला यांचे साहाय्यक प्रशिक्षक म्हणून काम केले आहे. तसेच त्यांना लिस्टर सिटी आणि चेल्सी या संघांना मार्गदर्शन करण्याचाही अनुभव आहे.

## ऋषभ पंतने पराभवानंतर वक्तव्यादरम्यान घातली शिवी

**मुंबई/वृत्तसंस्था**

ऋषभ पंतच्या नेतृत्त्वाखालील लखनौ सुपर जायंट्स संघाला राजस्थान रॉयल्सविरूद्ध सामन्यात पराभव पत्करावा लागला आहे. पंतच्या संघाची यंदाच्या आयपीएलमधील कामगिरी फारच निराशाजनक राहिला आहे. राजस्थानविरूद्ध देखील वादळी सुरूवातीनंतर संघ २२० धावा करू शकला. या पराभवानंतर बोलताना ऋषभ पंतने शिवी घातल्याचं ऐकू आलं. त्याचं हे वक्तव्य चांगलंच व्हायरल झालं आहे.



सध्या ऋषभ पंतचं नशीब खराब आहे असंच म्हणावं लागेल. आयपीएलमध्ये त्याच्या संघाची कामगिरी खराब राहिली आहे, त्याला भारताच्या एकदिवसीय संघातून वगळण्यात आलं आहे, त्याच्याकडून कसोटी उपकर्णधारपद काढून घेण्यात आलं आहे आणि आता त्याने आयपीएलच्या एका मुलाखतीदरम्यान अपमानास्पद भाषेचा वापरही केला आहे. लखनौ सुपरजायंट्सच्या पराभवानंतर ऋषभ पंतने इयान बिशप यांच्याशी बोलताना अपमानास्पद भाषेचा वापर केला होता.

राजस्थानविरूद्ध पराभवानंतर ऋषभ पंतने इयान बिशप यांच्याशी संवाद साधला. पंत म्हणाला, "आर्चरने मधल्या षटकांमध्ये आणि शेवटच्या षटकात ज्या प्रकारे गोलंदाजी केली ती उत्कृष्ट होती. आम्ही तिथे आणखी १० धावा करू शकलो असतो, पण शेवटच्या षटकात आम्हाला ते जमलं नाही." फलंदाजीसाठी उपयुक्त असलेल्या खेळपट्टीवर धावसंख्येचा बचाव करण्याबद्दल पंत म्हणाला, "नक्कीच हे कठीण असतं. तुम्हाला कायम आपल्या गोलंदाजांवर विश्वास ठेवायचा असतो, पण काही वेळा परिस्थिती अवघड असते. अशा खेळपट्टीवर गोलंदाजांकडे चुकांची फारशी मुभा नसते आणि खूप सूचना देणंही उपयोगाचं ठरत नाही. काही वेळा साधा प्लॅन ठेवून, प्रत्येक चेंडूवर लक्ष केंद्रित करत त्याची अंमलबजावणी करणं महत्त्वाचं असतं."

मोहम्मद शमीच्या अनुपस्थितीबद्दल पंतने सांगितलं, "अनुभव ही अशी गोष्ट आहे जी चांगल्या किंवा वाईट काळातही जाणवतच राहते. कारण अनुभव एका रात्रीत मिळत नाही. त्यासाठी अनेक वर्षे लागतात. विशेषतः दबावाच्या क्षणी अनुभवच तुम्हाला इतरांपेक्षा पुढे ठेवतो."

"मी आधीही सांगितलं आहे, सध्याची परिस्थिती काहीही असली तरी आम्हाला आमच्या संघाचा अभिमान आहे. आमच्याकडे असा संघ आहे, जो सामने जिंकू शकतो, याची आम्हाला पूर्ण जाणीव आहे. परिस्थिती आमच्या बाजूने गेली नाही, हे सगळ्यांनाच माहित आहे. पण त्यामुळे आम्ही जबरदस्त .... (शिवी) (f**king Good Team) संघ आहोत, ही गोष्ट बदलत नाही," असं पंत अखेरीस म्हणाला. पंतने बोलताना हा शब्द वापरल्याने त्याला दंड होऊ शकतो आणि बीसीसीआय त्याच्यावर कारवाई करू शकते.

# "तू नेहमीच माझ्या पाठीशी उभा राहिलास", विराटसाठी पीव्ही सिंधूची भावुक पोस्ट, भेटीदरम्यान कोहलीने दिला खास सल्ला

**मुंबई)/वृत्तसंस्था**

भारताची डबल ऑलिम्पिक पदक विजेती पीव्ही सिंधूने किंग कोहलीसाठी खास पोस्ट केली आहे. सिंधूने नुकतीच बंगळुरूमध्ये आयोजित आरसीबी इनोव्हेशन लॅबच्या इंडियन स्पोर्ट्स समिटमध्ये विराट कोहलीची भेट घेतली. विराटची भेट घेतल्यानंतर त्याच्याकडून मिळालेल्या खास सल्ल्याबद्दल तिने या पोस्टमध्ये खुलासा केला. भारतीय क्रीडा विश्वातील एक मोठं आणि प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व म्हणून सिंधूने विराटचं कौतुक केलं. त्याचा साधेपणा, नम्र स्वभाव आणि इतर खेळाडूंना प्रेरणा देण्याची वृत्ती विशेष असल्याचंही ती म्हणाली.



पीव्ही सिंधू आणि विराट कोहलीच्या बंगळुरूमधील कार्यक्रमापूर्वीच्या भेटीचे फोटो पाहायला मिळत आहेत. आरसीबीने सोशल मीडियावर अकाऊंटवर हे फोटो शेअर केले आहेत. विराटने भेटल्यानंतर आधी हा मिळवत तिच्याशी काही वेळ गप्पा मारल्या.

विराट कोहलीसोबतच्या भेटीनंतर सिंधूने शेअर केलेल्या पोस्टमध्ये तिने भावुक असं कॅप्शन लिहिलं आहे. "जेव्हा-जेव्हा मला मार्गदर्शनाची गरज भासली, तेव्हा तू नेहमी योग्य सल्ला आणि पाठिंबा देत माझ्यासोबत उभा राहिलास. भारतीय क्रीडा विश्वात खऱ्या अर्थाने 'सीनियर' कसं असावं, याचं तुझ्यापेक्षा उत्तम उदाहरण असू शकत नाही, उदार, विनम्र, प्रेरणादायी आणि कायम इतरांना पुढे नेण्यासाठी तयार असणारा. पीव्ही, कधीही मागे हटू नकोस,' तुझा हा सल्ला कायम लक्षात ठेवेन," असं पीव्हीने या कॅप्शनमध्ये लिहिलं आहे.


अखेरीस तिने एक वाक्य लिहित विराटचं पुन्हा कौतुक केलं, तू जसा आहेस तसाच कायम राहा. "तुझ्यासारख्या व्यक्तींमुळे भारतीय क्रीडा विश्व अधिक समृद्ध आणि सुंदर आहे," असं अखेरीस सिंधू म्हणाली. सिंधूसाठी गेले काही महिने फार चढउतारांनी भरलेले ठरले. २०२५ च्या उत्तरार्धात दुखापतींमुळे तिला अनेक अडचणींचा सामना करावा लागला होता. मात्र, पुनरागमनानंतर सिंधूने आशादायक कामगिरी करत पुन्हा आपली छाप पाडली. २०२५ बीडब्ल्यूएफ वर्ल्ड चॅम्पियनशिपमध्ये तिने जागतिक क्रमवारीत दुसऱ्या स्थानावर असलेल्या वांग झियीला धक्का देत उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला होता. हा तिच्या पुनरागमनातील सर्वात उल्लेखनीय क्षणांपैकी एक ठरला.

तसेच, चीन मास्टर्स स्पर्धेत तिने थायलंडच्या पोर्नपावी चोचुवाँगविरुद्ध शानदार विजय मिळवत आपला आत्मविश्वास पुन्हा मिळवल्याचे संकेत दिले. मात्र सिंधूसाठी २०२६ हे वर्ष अधिक आव्हानात्मक ठरत आहे. मलेशिया ओपनमध्ये तिने उपांत्य फेरीपर्यंत मजल मारली होती, पण त्यानंतर तिला सरळ गेममध्ये पराभव स्वीकारावा लागला.

# आधी अपहरण मग सहा दिवसांनी पंजाबी म्युझिक इंडस्ट्रीतील गायिका इंदर कौरची अमानुष हत्या

पंजाबी म्युझिक इंडस्ट्रीतील प्रसिद्ध गायिका इंदर कौर उर्फ यशइंदर कौर. ६ दिवसांपूर्वी बंदुकीचा धाक दाखवून तिचे अपहरण करण्यात आले होते. अखेर तिचा मृतदेह नीलो कालव्यात आढळल्याने एकच खळबळ उडाली आहे. या घटनेने तिच्या कुटुंबावर दुखाचा डोंगर कोसळला आहे. इंदरचा भाऊ जोतइंदर यांनी पोलिसांकडे दाखल केलेल्या तक्रारीनुसार, १३ मे रोजी इंदर रात्र साडेआठच्या सुमारास तिच्या कारमधून रेशन आणण्यासाठी बाजारात निघाली होती. मात्र, रात्र झाली, तरी ती घरी परतलीच नाही. कुटुंबीयांनी तिचा सर्वत्र शोध घेतला. पण ती कुठेही सापडली नाही.

अशातच, मोगा येथील भलूर गावातील सुखविंदर सिंह उर्फ सुक्खा याच्यावर त्यांचा संशय गेला. सुखविंदरला इंदरशी जबरदस्ती लग्न करायचे होते, पण इंदरने त्याला स्पष्ट नकार दिला होता. याच नकाराचा राग मनात धरून सुखविंदरने तिच्या किडनॅपिंगचा प्लॅन आखला. समोर





आलेल्या माहितीनुसार, सुखविंदर सिंह केवळ इंदरला लग्नासाठी धमकावण्यासाठी तो थेट कॅनडाहून पंजाबला आला होता. १३ मेला त्याने काही गुंडांच्या साथीने इंदरची गाडी रस्त्यात अडवली. बंदुकीचा धाक दाखवून तिचे अपहरण केले आणि नंतर तिची हत्या करून पुरावे नष्ट करण्यासाठी तिचा मृतदेह कालव्यात फेकून दिला.

धक्कादायक गोष्ट म्हणजे, इंदरची हत्या केल्यानंतर सुखविंदर कॅनडाला पळून गेला आहे. दरम्यान, इंदरच्या तपासावरून कुटुंबियांनी पंजाब पोलिसांच्या कार्यपद्धतीवरून संताप व्यक्त केला आहे. १५ मे रोजीच मुख्य आरोपी सुखविंदर आणि त्याचा साथीदार करमजीत सिंह यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलिसांनी जर वेळीच हालचाल केली असती, तर आज इंदर जिवंत असती, असा आरोप कुटुंबाने केला आहे. सध्या जमालपुर ठाण्याचे पोलीस अधिकारी बलबीर सिंह यांनी दिलेल्या माहितीनुसार, गुन्हा दाखल झाला असून फरार आरोपींना पकडण्यासाठी आणि कॅनडा गेलेल्या मुख्य आरोपीला भारतात परत आणण्यासाठी कायदेशीर हालचाली सुरू आहेत.

---

## दशकानंतर सुकन्या मोने यांचे रंगभूमीवर पुनरागमन

दशकांपूर्वी सेल्फी या नाटकातून आपल्या अभिनयाचे पैलू मराठी रंगभूमीच्या मंचावर पेरणाऱ्या सुकन्या मोने अवघ्या दशकानंतर पुन्हा एकदा मराठी रंगभूमीची सेवा करण्यास सज्ज झाले आहेत. विशेष बाब म्हणजे गिरीश ओक आणि सुकन्या मोने हे अभिनयाचे दोन महामेरू, अवघ्या ३० वर्षांनंतर एकत्र रंगभूमीवर झळकणार आहेत. 'आता थांबवायचं कसं?' या नाटकाच्या माध्यमातून हे दोन नाट्यकलाकार नाट्यप्रेक्षकांच्या भेटीला येत आहेत. हे नाटक बहुप्रतीक्षित असून नाटक पाहण्यासाठी नाट्यप्रेक्षक आतुर झाले आहेत.



आता थांबवायचं कसं? या नाटकात मुख्य भूमिकेत जेष्ठ अभिनेत्री सुकन्या मोने तसेच दिग्गज अभिनेते डॉ.गिरीश ओक झळकणार आहेत. या नाटकाचा विषय आधुनिक कुटुंबाच्या अवतीभोवती फिरतो. एकंदरीत, आताच्या कुटुंब पद्धतीत सोशल मीडियाचा वापर सर्रास होतो. घरातली सगळी मंडळी सोशल मीडिया तसेच आधुनिक तंत्रज्ञानाचा आहारी गेली आहे, याचा परिणाम कुटुंबावर कसा होतो? या सगळ्या गोष्टी या नाटकात पाहायला मिळणार आहे. गिरीश ओक म्हणतात की, "सुकण्याबरोबर नाटक करताना, अनेक जुन्या आठवणींना उजाळा मिळाला. तिचे आणि संजयचे लग्नही आमच्या डोळ्यादेखत झाले. आज आम्ही दोघे नव्या केमिस्ट्रीसह तब्बल ३० वर्षांनी रंगमंचावर एकत्र आलो आहोत." आता थांबवायचं कसं? या नाटकाबद्दल सांगताना ते म्हणाले की "या नाटकाची कथा मी पनवेलमध्ये एकदा पहिली होती. एकंदरीत, ती एकांकिकाच होती. मी एका मुलीचा बाप आहे आणि या नाटकाची कथा मला हादरून सोडणारी होती. ही कथा पाहून मला वाटले की हे नाटक व्यावसायिक रंगभूमीवर येणे फार महत्वाचे आहे आणि अर्थातच त्यासाठी मी फार प्रयत्नही केले." पुढे गिरीश ओक म्हणतात की, "या नाटकात मी वडिलांची भूमिका साकारली आहे. या नाटकातली माझी भूमिका आणि माझ्या वैयक्तिक आयुष्यात वडील म्हणून माझी भूमिका, यामुळे मी भावनांची तीव्रता समजू शकतो. एकंदरीत, माझा विश्वास आहे की 'हे नाटक पालक आणि मुलांमधला संवाद अधिक मजबूत करेल."

## ६० व्या वर्षी सलमान खान पडला एकटा?

सलमान खान हा एकटेपणावरून चर्चेत आला आहे. नुकताच त्याने इन्स्टाग्रामवर अंधाऱ्या खोलीतील सिक्स पॅक फ्लॉन्ट करणारा फोटो पोस्ट केला होता. वयाच्या ६० व्या वर्षीदेखील सलमानचा जबरदस्त फिटनेस पाहून चाहत्यांनी आश्चर्य व्यक्त केले. मात्र, या फोटोला आयुष्यात एकटेपणा आल्याचे कॅप्शन सलमानने दिल्याने चर्चांना उधाण आले. यावरून जोरदार चर्चा रंगू लागल्याने सलमानने पुन्हा एकदा पोस्ट करून स्पष्टीकरण दिले आहे.

सलमान खानने एकटेपणावर कॅप्शन लिहिल्याने चाहत्यांनी काळजी व्यक्त केली. सोशल मीडियावर यावरून चर्चा सुरू झाल्या. अगदी सलमानची एक्स संगीता बिजलानी आणि 'लकी' या चित्रपटात सलमानसोबत काम करणारी स्नेहा उल्लाल यांनी फोटोवर कमेंट केल्या आहेत. हे व्हायरल झाल्यानंतर सलमान खानने आणखी एक पोस्ट करून मी एकटा नाही आणि या चर्चांमुळे मला आईनेसुद्धा काही प्रोब्लेम आहे का असे विचारत असल्याचे सांगितले. एकटेपणावर स्पष्टीकरण देत सलमान खानने लिहिले आहे की, अरे यार, मी माझ्याबद्दल सांगत नव्हतो; मला एवढं छान मोठं कुटुंब, चाहते अन् मित्रपरिवार असताना मला एकटं कसं वाटेल? माझ्याबरोबर चाहत्यांचं प्रेम, आशीर्वाद सदैव आहेत. मला या सगळ्यांच्या प्रेमाची जाणीव आहे.

## 'हनु-मॅन ३डी' २५ जूनरोजी होणार प्रदर्शित




तेलुगु सुपरहिरो चित्रपट 'हनु-मॅन' पुन्हा एकदा मोठ्या पडद्यावर परत येणार आहे. यावेळी हा चित्रपट ३ डी फॉरमॅटमध्ये प्रदर्शित केला जाईल, ज्यामुळे प्रेक्षकांना पूर्वीपेक्षा अधिक भव्य आणि रोमांचक सिनेमाचा अनुभव मिळेल. निर्मात्यांनी अधिकृत घोषणा करत सांगितले की, 'हनु-मॅन ३ डी' २५ जून रोजी जगभरातील चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होईल. निर्मात्यांनी नवीन पोस्टरसह सोशल मीडियावर माहिती शेअर करत म्हटले की, या चित्रपटाने यापूर्वीच प्रेक्षकांच्या मनावर राज्य केले आहे आणि आता तो नवीन रूपात परत येत आहे.

२०२४ मध्ये प्रदर्शित झालेल्या या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर मोठे यश मिळवले होते आणि भारतीय सुपरहिरो चित्रपटांसाठी एक नवीन सुरुवात मानली गेली होती. चित्रपटाची कथा काल्पनिक गाव अंजनाद्रीवर आधारित आहे, जिथे हनुमंथु नावाचा एक सामान्य तरुण भगवान हनुमानाची दिव्य शक्ती प्राप्त केल्यानंतर लोकांचे रक्षण करतो. यात तेजा व्यतिरिक्त अमृता अय्यर, वरलक्ष्मी सरथकुमार, समुद्रकानी आणि विनय राय यांनीही महत्त्वाच्या भूमिका साकारल्या होत्या. दिग्दर्शक प्रशांत वर्मा यांचा हा चित्रपट त्यांच्या सिनेमॅटिक युनिव्हर्समधील पहिली कडी मानली जाते. चित्रपटाच्या यशानंतर आता त्याच्या पुढील भाग जय हनुमान बद्दलही प्रेक्षकांमध्ये खूप उत्साह आहे. आगामी चित्रपटात ऋषभ शेट्टी देखील दिसू शकतात.

---

## 'दृश्य–अदृश्य' प्रेक्षकांच्या भेटीला येण्यासाठी सज्ज

नेहमीच वेगळ्या धाटणीचे सिनेमे बनविण्यासाठी प्रसिद्ध असलेल्या मराठी सिनेसृष्टीत पुन्हा एकदा एका ज्वलंत विषयाला वाचा फोडण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. आपल्या डोळ्यांना दिसते ते सत्य की, आपल्याला होणारे भास खरे या अनाकलनीय कोड्याचे उत्तर शोधणारा 'दृश्य-अदृश्य' हा मराठी चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येण्यासाठी सज्ज आहे.

क्षणाक्षणाला उत्कंठा वाढविणारे कथानक, आघाडीच्या कलाकारांचा सर्वोत्तम अभिनय आणि कुशल दिग्दर्शन असलेला 'दृश्य-अदृश्य' हा चित्रपट १९ जून रोजी संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार आहे. ५६ व्या आंतरराष्ट्रीय भारतीय चित्रपट महोत्सव म्हणजेच 'इफ्फी'मध्ये या सिनेमाने जागतिक पातळीवरील प्रेक्षकांचे लक्ष वेधण्यात यश मिळविले. त्यानंतर खऱ्या अर्थाने प्रकाशझोतात आलेल्या सिनेमाचा टिझर नुकताच प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे.

आरएसटी कॅनव्हास निर्मित 'दृश्य-अदृश्य' या सस्पेन्स थ्रिलर चित्रपटाची निर्मिती प्रद्योत पेंढारकर, अनिल वर्खडे, दत्ताजी थोरात, धनंजय थोरात, पृथ्वीराज खेडकर, युवराज खेडकर आणि अश्विनी खेडकर यांनी केली आहे. आजवर बऱ्याच आशयघन यशस्वी चित्रपटांचे दिग्दर्शन करणाऱ्या मिलिंद लेले यांनी 'दृश्य-अदृश्य'चे दिग्दर्शन केले आहे. दिग्दर्शनासोबतच 'दृश्य-अदृश्य'चे कथा-पटकथा लेखन मिलिंद लेले यांनीच केले असून, संवाद अस्मिता कुलकर्णी यांनी लिहिले आहेत. 'जे दिसतं तेच खरं असतं का?' हा प्रश्न विचारत या चित्रपटाचा टिझर प्रदर्शित झाला आहे.

२५ लाख रुपयांच्या इन्सेन्टिव्हचे सिक्रेट टिझरमधील रहस्य आणखी गडद करणारे असून, चित्रपटाबाबत कुतूहल जागविणारे आहे. डोळ्यांवर विश्वास ठेवायचा की मनावर? हा प्रश्न उपस्थित करीत टिझर मनातील गुंतागुंत आणखी वाढवतो. भास आणि सत्य यात खूप मोठे अंतर असल्याचे टिझर अधोरेखित करतो. माणूस ओळखणे कठीण की सत्य? हा टिझरमध्ये विचारलेला प्रश्नही खोलवर विचार करायला लावतो. टिझर खऱ्या अर्थाने चित्रपटाबाबत उत्सुकता वाढविणारा असून, प्रदर्शनानंतर लगेचच सोशल मीडियावर टिझरला नेटकऱ्यांचा तूफान प्रतिसाद मिळत आहे.



दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# ऑनलाईन फार्मसीच्या निषेधार्थ देशभरात केमिस्ट बंद; बुलढाण्यात भव्य मूक मोर्चा!

**जनसंचलन बुलढाणा**

देशभरात ऑनलाईन औषध विक्रीच्या ( ) विरोधात आणि विविध मागण्यांसाठी केमिस्ट संघटना आक्रमक झाल्या आहेत. ऑल इंडिया केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनच्या () वतीने आज देशव्यापी बंदची हाक देण्यात आली आहे. याच पार्श्वभूमीवर बुलढाणा जिल्हा केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनच्या वतीने जिल्ह्यात भव्य मूक मोर्चा काढण्यात आला. केंद्र सरकारच्या ऑनलाईन फार्मसी धोरणाचा निषेध करण्यासाठी आज देशभरातील औषध विक्रेत्यांनी लाक्षणिक बंद पुकारला आहे. महाराष्ट्रासह तब्बल ३० राज्यांमध्ये या बंदला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. बुलढाणा येथे जिल्हा केमिस्ट असोसिएशनच्या वतीने काळ्या फिती लावून शांततापूर्ण मार्गाने भव्य मूक मोर्चा काढण्यात आला आणि जिल्हाधिकाऱ्यांना मागण्यांचे निवेदन देण्यात आले. ऑनलाईन औषध विक्री आणि घरपोच ( ) सेवा देणाऱ्या नियमावली तात्काळ मागे घ्यावी.



ऑनलाईन विक्रीमुळे गर्भपाताची औषधे ( ) आणि नशायुक्त औषधे थेट लोकांपर्यंत पोहोचत असून, यामुळे तरुण पिढी व्यसनाच्या गर्तेत जात असल्याचा आरोप संघटनेने केला आहे. कॉर्पोरेट कंपन्यांकडून औषधांवर दिल्या जाणाऱ्या अवाजवी सवलती बंद करून बाजारात निकोप स्पर्धा निर्माण व्हावी. या देशव्यापी बंदमुळे आज सर्वसामान्य रुग्णांची गैरसोय टळावी म्हणून आपत्कालीन औषध पुरवठा सुरू ठेवण्यात आला असला, तरी औषध विक्रेत्यांच्या या पवित्र्यामुळे केंद्र सरकार आता काय निर्णय घेणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# अजंठा ॲग्रो सर्व्हिसेस सेंटरवर पोलिसांची कारवाई

## खतांचा काळाबाजार आणि फसवणूक केल्याप्रप्रकरणी गुन्हा दाखल!

**जनसंचलन मेहकर**

शेतकऱ्यांच्या नावे आधार कार्डचा गैरवापर करून ऑनलाईन ई-पॉस (-) प्रणालीवर खतांची बनावट विक्री दाखवणे, अनुदानित युरिया खताचा काळाबाजार करणे आणि परवाना संपलेले तसेच विनापरवाना अनधिकृत कीटकनाशके/खते बाळगल्याप्रकरणी मेहकर येथील अजंठा ॲग्रो सर्व्हिसेस सेंटर चे मालक महेश शामसुंदर गट्टाणी यांच्याविरुद्ध मेहकर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कृषी विभागाच्या गुणवत्ता नियंत्रण पथकाने ही धडक कारवाई केली आहे. उकळी (ता. मेहकर) येथील शेतकरी नयन विश्वासराव खरात यांनी तालुका कृषी अधिकारी कार्यालयाकडे लेखी तक्रार केली होती. त्यांनी अजंठा ॲग्रो सर्व्हिस सेंटरमधून सिंगल सुपर फॉस्फेट () खताच्या ६ बॅगा खरेदी केल्या होत्या. परंतु, त्यांच्या आधार कार्डचा गैरवापर करून ई-पॉस (-) मशीनवर त्यांच्या नावे डी.ए.पी. () च्या ८ बॅगा आणि २०:२०:0:१३ खताच्या १५ बॅगा खरेदी केल्याचा बनावट मेसेज त्यांच्या मोबाईलवर आला. या गंभीर तक्रारीची दखल घेत दि. १६ मे २०२६ रोजी जिल्हा भरारी पथकाचे अध्यक्ष व मोहीम अधिकारी प्रमोद गायके, जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक गणेश सावंत, तालुका कृषी अधिकारी व खत निरीक्षक उद्धव शामराव काळे आणि कृषी अधिकारी संदेश गायकवाड यांच्या पथकाने अजंठा ॲग्रो सर्व्हिसेस सेंटरची प्रत्यक्ष तपासणी केली. तपासणीदरम्यान शेतकरी नयन खरात यांच्या नावे ई-पॉस प्रणालीमध्ये खतांची बनावट विक्री नोंदवून शासनाची व शेतकऱ्यांची फसवणूक केल्याचे निष्पन्न झाले. दुकानात तपासणी केली असता -३०३ आणि सारख्या नामांकित कंपन्यांच्या उत्पादनांची परवाना वैधता संपलेली आढळली. तसेच , आणि या खत व औषधांचे विक्रेत्याकडे कोणतेही वैध परवाने मिळून आले नाहीत. ई-पॉस मशीनवरील ऑनलाईन साठा आणि गोदामातील प्रत्यक्ष साठा यात प्रचंड तफावत आढळली. कंपनीचा युरिया ऑनलाईन २१९ बॅग दाखवत असताना प्रत्यक्षात २७६ बॅग उपलब्ध होता. तर कंपनीचा युरिया ऑनलाईन शून्य दाखवत असताना प्रत्यक्षात गोदामात ६९ बॅग आढळून आला. साठा रजिस्टर देखील अपूर्ण होते. ऑनलाईन ई-पॉस मशीनवर युरिया खताची शेतकऱ्यांना फक्त आभासी (व्हर्च्युअल) पद्धतीने विक्री दाखवून, प्रत्यक्षात तो अनुदानित युरिया अकृषक कामासाठी अवैधरित्या विकून शासकीय अनुदान लाटण्याचा मोठा काळाबाजार याठिकाणी सुरू असल्याचे उघड झाले. याप्रकरणी खत निरीक्षक तथा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक उद्धव शामराव काळे यांच्या फिर्यादीवरून मेहकर पोलिसांनी आरोपी महेश शामसुंदर गट्टाणी (प्रो.प्रा. अजंठा ॲग्रो सर्व्हिसेस सेंटर, मेहकर) याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता (), २०२३ च्या कलम ३१८(४), ३१६, ३३६(३) सह रासायनिक खते नियंत्रण आदेश १९८५, खत वाहतूक व नियंत्रण आदेश १९७३ आणि अत्यावश्यक वस्तू अधिनियम १९५५ च्या कलम ३ व ७ अन्वये गुन्हा (रजि. नं. ०३४८/२०२६) दाखल केला आहे. पुढील तपास मेहकर पोलीस करत असल्याची माहिती कृषि विभागाव्दारे प्रसिद्धीपत्रकाव्दारे कळविली आहे.

# घाबरू नका, जिल्ह्यात पुरेसा इंधनसाठा!

## वाहनांमध्ये स्टॉक जमा करून न ठेवण्याची सूचना

## दरवाढीसोबतच २५ टक्क्यांनी विक्रीही वाढली




**जनसंचलन/बुलढाणा**

बुलढाणा जिल्ह्यातील कथित इंधन टंचाईमुळे जवळपास पेट्रोल पंपांवर मोठी गर्दी पाहायला मिळतीये. पेट्रोलसाठी कुठे एक दीड किलोमीटर रांगा? तर कुठे मारामारीपर्यंतच्या घटना समोर आल्यात. परंतु, जिल्ह्यात इंधन परिस्थिती नेमकी कशी आहे? गॅस पुरवठा कसा होतोय? हे सगळं या व्हिडिओच्या माध्यमातून समजून घेऊया.. इंधनाची आणि गॅस सिलेंडरची उपलब्धतेची माहिती देताना महसूल प्रशासनाने अनेक गोष्टी स्पष्ट केल्या. निवासी जिल्हाधिकारी सुरेश कव्हळे यांनी दिलेल्या माहितीनुसार, जिल्ह्यात आजरोजी ९६0 किलोलीटर पेट्रोल, १ हजार ५७२ किलोलीटर डिझेल, त्याचबरोबर १५ हजार ९६९ किलो गॅससाठा उपलब्ध आहे. जिल्ह्यासाठी हा पुरेसा साठा आहे, मात्र काही दिवसांपासून मागणी वाढत असल्याने २0 ते २५ टक्क्यांनी विक्रीमध्ये वाढ झाली. त्यामुळे, घाबरून नका तसेच आपल्या वाहनांमध्ये अतिरिक्त साठा जमा करून ठेवू नका असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे. महत्त्वाचे म्हणजे, पेट्रोल पंप चालकांनी आपल्या पेट्रोल पंपावर फलक लावून नागरिकांचा गैरसमज दूर करावा, अशीही सूचना प्रशासनाने दिली आहे.



# चुन्याच्या पुड्यांचा खेळ मुलांच्या डोळ्यांसाठी ठरतोय घातक!

## नेत्रतज्ज्ञ म्हणतात पालकांनो वेळीच लक्ष द्या....

**जनसंचलन बुलढाणा**

रस्त्यावर फेकलेल्या चुन्याच्या पुड्या मुळे लहान मुलांच्या डोळ्यांचे आरोग्यच धोक्यात आले आहे. खेळ म्हणून पुडी फोडताना फटाक्यासारखा फट्ट आवाज करणारी पुडी कायमच्या अपंगात्वाला कारणीभूत ठरू लागली आहे. डोळ्यात चुना जाऊन अनेक लहान मुले सध्या दवाखान्यात भरती होत आहे.ही बाब गंभीर व सार्वत्रिकरित्या आढळत असल्याने पालकांनी याबाबत जागरूक राहण्याचे आवाहन नेत्रतज्ञ डॉ. शोन चिंचोले यांनी केले आहे. किराणा दुकानांमध्ये काही विशिष्ट तंबाखू उत्पादनांसोबत छोट्या हवाबंद चुन्याच्या पुड्या दिल्या जातात. अनेक वेळा तंबाखू घेणारे ग्राहक या चुन्याच्या पुड्या वापरत नाही. परिणामी दुकानदारांकडे या पुड्यांचा साठा उरतो आणि काही ठिकाणी त्या रस्त्यावर किंवा दुकानाबाहेर फेकून दिल्या जातात. हाच निष्काळजीपणा लहान मुलांच्या डोळ्यांसाठी मोठा धोका ठरत आहे.

लहान मुलांनी खेळ म्हणून फोडलेली पुडी फुटली की चुना डोळ्यात जाऊन कायम स्वरुपी दृष्टीदोष,अंधत्व व अनेक समस्यां उद्भवत आहे. सध्या ही समस्या सार्वत्रिक दिसत असून नेत्रतज्ञांनी गंभीर इशारा दिला आहे. हवाबंद पुड्यांमध्ये दाब (प्रेशर) असल्यामुळे लहान मुले त्या चप्पलने दाबून, दगडाने ठेचून किंवा फटाक्यासारख्या आवाजासाठी फोडतात. पुडी फुटताच त्यातील चुना हवेत उडून थेट डोळ्यांमध्ये जातो. चेहऱ्याजवळ असल्यामुळे सर्वाधिक परिणाम डोळ्यांवर होतो. चुना डोळ्यात गेल्यानंतर तीव्र जळजळ, लालसरपणा, पाणी येणे, डोळा न उघडता येणे, असह्य वेदना अशा तक्रारी त्वरित सुरू होतात. लहान मुले घाबरून डोळे चोळतात, त्यामुळे इजा आणखी वाढते. चुना डोळ्याच्या आतील भागात जाऊन कंजंक्टिव्हा व बुबुळावर (कॉर्निया) गंभीर घर्षण निर्माण करतो. रासायनिक प्रतिक्रिया होऊन कॉर्नियावर जखम, पांढरे डाग किंवा अल्सर तयार होऊ



शकतात. काही प्रकरणांमध्ये ही इजा कायमस्वरूपी राहून दृष्टी कमी होण्याचा किंवा अंधत्वाचा धोका उद्भवत आहे. दर दोन-तीन दिवसांनी अशा प्रकारच्या दुर्घटनांमध्ये जखमी झालेली लहान मुले दवाखान्यात येत असल्याचे नेत्रतज्ञ डॉक्टर शोन चिंचोले म्हणाले. काही वेळा इजा सौम्य असते, तर काही वेळा ती अत्यंत गंभीर स्वरूपाची असते. म्हणून सर्व दुकानदार, व्यावसायिक आणि नागरिकांनी मुलांना सूचना देऊन जागरूक करावे. उरलेल्या चुन्याच्या पुड्या रस्त्यावर किंवा उघड्या जागेत फेकू नयेत. त्या सुरक्षितरीत्या नष्ट कराव्यात. तसेच पालकांनी मुलांना अशा पुड्यांपासून दूर ठेवावे असे आवाहन डॉक्टर शॉन चिंचोले यांनी केले आहे.

# महिनाभरात २४ बालविवाह रोखले नागरिकांना १०९८ वर माहिती देण्याचे आवाहन

**जनसंचलन/बुलढाणा**

महिला व बाल विकास विभाग अंतर्गत कार्यरत चाइल्ड हेल्पलाईन १०९८ व जिल्हा बाल संरक्षण कक्ष, बुलढाणा यांनी मागील एका महिन्यात जिल्ह्यातील तब्बल २४ बालविवाह रोखण्यात यश मिळविले आहे. बालविवाह प्रतिबंधासाठी प्रशासनाने ॲक्शन मोडमध्ये काम करत विविध यंत्रणांच्या समन्वयातून ही प्रभावी कारवाई केली. चाइल्ड हेल्पलाईन १०९८ बुलढाणा यांना प्राप्त झालेल्या २४ तक्रारींवर तातडीने कार्यवाही करण्यात आली. जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी अमोल डिघुळे, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी दिवेश मराठे तसेच बालकल्याण समितीचे अध्यक्ष मनोज डांगे यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबविण्यात आली. चाइल्ड हेल्पलाईन बुलढाणा टीममधील प्रकल्प समन्वयक श्री. शेख, समुपदेशक विद्या खरे, पर्यवेक्षक सागर नरवाडे, केस वर्कर प्रवीण गवई, मुकेश मोरे व राहुल सुरडकर यांनी गावपातळीवर ग्राम बाल संरक्षण समिती, ग्रामसेवक, बालविवाह प्रतिबंधक अधिकारी, अंगणवाडी सुपरवायझर तसेच संबंधित पोलीस स्टेशन यांच्याशी समन्वय साधून संभाव्य बालविवाह थांबविण्यासाठी प्रभावी कार्यवाही केली. तक्रार प्राप्त होताच चाइल्ड हेल्पलाईन टीमने घटनास्थळी भेट देऊन संबंधित पोलीस स्टेशन, पोलीस हेल्पलाईन ११२, ग्रामीण व शहरी भागातील बालविवाह प्रतिबंधक अधिकारी आणि अंगणवाडी यंत्रणेसोबत समन्वय साधत बालिकांचे विवाह थांबविले. त्यानंतर संबंधित बालिकांना पुढील कार्यवाहीसाठी बालकल्याण समिती, बुलढाणा येथे हजर करण्यात आले. बालकल्याण समितीने बालिकांची मुलाखत घेऊन प्रकरणांची चौकशी केली. काही गंभीर प्रकरणांमध्ये बालिकांची रवानगी शासकीय बालिका गृह, बुलढाणा येथे करण्यात आली. तसेच जिल्हा बाल संरक्षण कक्षातील समुपदेशक शारदा पवार व चाइल्ड हेल्पलाईन समुपदेशक विद्या खरे यांनी बालिकांचे समुपदेशन करून त्यांना बालविवाह प्रतिबंधक कायदा व शिक्षणाचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन केले.

# शिक्षण क्षेत्रातून एक अत्यंत धक्कादायक आणि संतापजनक बातमी समोर




**जनसंचलन/बुलढाणा**

शिक्षण क्षेत्रातून एक अत्यंत धक्कादायक आणि संतापजनक बातमी समोर आलीये. बुलढाणा शहरात पालकांचा विश्वासघात आणि शासनाच्या तिजोरीवर दरोडा टाकण्याचा प्रयत्नाचा एक मोठा शिक्षण घोटाळा उघडकीस आलाय! इंग्रजी माध्यमाच्या नावाखाली पालकांकडून हजारो रुपयांची फी वसूल करायची, पण शासनाचे अनुदान लाटण्याच्या प्रयत्नात त्याच विद्यार्थ्यांचे प्रवेश पालकांना अंधारात ठेवून चक्क १०० टक्के अनुदानित मराठी शाळेत दाखवायचे! असा हा काळाबाजार बुलढाण्यात सुरू असल्याचा खळबळजनक आरोप पालकांनी केलाय. या घोटाळ्याप्रकरणी बुलढाण्यातील माऊंट सनाई इंग्लिश स्कुल आणि जनाबाई मराठी प्राथमिक शाळा यांच्याविरोधात थेट शिक्षणाधिकाऱ्यांकडे गंभीर तक्रार पालक यांनी दाखल केलीये. होय, हा खेळ सुरू आहे विद्यार्थ्यांच्या भविष्याशी आणि पालकांच्या कष्टाच्या पैशांशी! बुलढाण्यातील मिर्झा नगर भागातील माऊंट सनाई इंग्लिश स्कुल आणि जनाबाई मराठी प्राथमिक शाळा ही एकच ठिकाणी सुरू असून यांच्या संचालक मंडळाने, मुख्याध्यापक आणि शिक्षकांनी संगनमत करून हा महाघोटाळा रचल्याचा आरोप होत आहे. जोहर नगर येथील रहिवासी मोहम्मद अन्सार शेख अनवर यांनी जेव्हा आपल्या मुलीला चार वर्षांनंतर चौथ्या वर्गातून इंग्रजी शाळेतून काढले आणि शाळा सोडल्याचा दाखला म्हणजेच टीसी घेतला, तेव्हा या संपूर्ण मधाचे पोळे फुटले! पालक मुलीला इंग्रजी माध्यमाची फी देत होते, गणवेश आणि पुस्तकेही इंग्रजीचीच खरेदी करत होते. मात्र, प्रशासकीय यंत्रणेत तपासणी केली असता, मुलीचा प्रवेश चक्क १०० टक्के अनुदानित जनाबाई मराठी प्राथमिक शाळेत दाखवून शासनाचे अनुदान लाटण्याच्या प्रयत्नात असल्याचे उघड झाले. हा प्रकार एका विद्यार्थ्यापुरता मर्यादित नाही, तर शेकडो विद्यार्थ्यांसोबत हाच फसवणुकीचा प्रकार घडला आहे. मोईन बेग अजीम बेग या दुसऱ्या पालकानेही आपला मुलगा माहीद बेग याची अशाच प्रकारे फसवणूक झाल्याची लेखी तक्रार अंगठ्याच्या ठश्यासह नोंदवलीये. शासकीय अनुदान लाटण्यासाठी पालकांना इंग्रजी माध्यम दाखवून पालकांच्या विनापरवानगी परस्पर शेकडो विद्यार्थ्यांचे मराठी शाळेत प्रवेशित करून हा घोटाळा करण्यात येत आहेत. तक्रारदारांनी अशा शेकडो विद्यार्थ्यांची यादीच आता शिक्षण विभागाला सोपवलीये. आता या प्रकरणी पालक मोहम्मद अन्सार आणि मोईन बेग यांनी आक्रमक भूमिका घेतली असून, शिक्षणमंत्री, शिक्षण संचालक,उपसंचालक,बुलढाणा शिक्षणाधिकारी,आणि बुलढाणा शहर ठाण्यापर्यंत धाव घेतली असून माऊंट सनाई इंग्लिश स्कुल आणि जनाबाई मराठी प्राथमिक शाळा या दोन्ही शाळांच्या संचालक, मुख्याध्यापक आणि शिक्षकांवर तात्काळ फौजदारी गुन्हे दाखल व्हावेत अशी मांगणी करून संपूर्ण प्रकरणाची ऑन कॅमेरा चौकशी व्हावी! व पालकांचा विश्वासघात करणाऱ्या दोन्ही शाळांची मान्यता तात्काळ रद्द करण्यात यावी!अशीही मांगणी करण्यात आलीये.. या संपूर्ण घोटाळ्यामुळे बुलढाणा जिल्ह्यात एकच खळबळ उडाली आहे. आता शिक्षण विभाग आणि पोलीस प्रशासन या शिक्षण सम्राटांवर काय कडक कारवाई करते? व शेकडो विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळणाऱ्यांना धडा शिकवणार का? याकडे संपूर्ण जिल्ह्याचे आणि महाराष्ट्राचे लक्ष लागलेय.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====

संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८